| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 14 Sep 2026 | Insurance cover for the 'Sarvagi Sundar' festival | Maharashtra Times (Marathi) |



# ‘सर्वांगी सुंदर’ उत्सवाला विम्याचे कवच

(चित्र : एआय)

**कोट्यवधी रुपयांचे दागिने आणि आकर्षक रोषणाईमुळे गणेशोत्सवाचा व्याप वाढला आहे. त्याबरोबरच आर्थिक जोखमीही वाढल्या आहेत. आग, चोरी, अपघात, मालमत्तेचे नुकसान ते कार्यक्रम रद्द होण्यापर्यंत अनपेक्षित घटनांमुळे गणेश मंडळांवर मोठा भार पडू शकतो. अशा संकटांपासून मंडळांना आर्थिक सुरक्षा देणाऱ्या ‘इव्हेंट इन्शुरन्स’चे कवच कसे काम करते, ते पाहूया.**

अमरनाथ सक्सेना
Matawealth@timesofindia.com

राज्यातील सर्वांत मोठ्या सार्वजनिक उत्सवांपैकी एक असलेला गणेशोत्सव दिवसेंदिवस अधिक भव्य होत आहे. नेत्रदीपक सजावट, सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी सजलेली गणेशमूर्ती आणि आकर्षक विद्युत रोषणाई पाहण्यासाठी प्रसिद्ध मंडळांमध्ये लाखो भाविक गर्दी करतात. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा उत्सव न राहता काटेकोर नियोजन आणि जोखीम व्यवस्थापनाची गरज असलेला मोठा सार्वजनिक सोहळा बनला आहे.

मोठी गर्दी, मौल्यवान दागिने, भव्य सजावट आणि विविध कार्यक्रमांमुळे अपघात, आग, चोरी, मालमत्तेचे नुकसान आणि सार्वजनिक दायित्व अशा अनेक जोखमी निर्माण होतात.

अग्निसुरक्षा, गर्दी नियंत्रण, सीसीटीव्ही, सुरक्षा कर्मचारी आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा यांसारख्या उपाययोजना केल्या तरी आकस्मिक घटना पूर्णपणे टाळता येत नाहीत. त्यामुळे संभाव्य आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळवण्यासाठी ‘इव्हेंट इन्शुरन्स’ महत्त्वाचा ठरतो. गेल्या वर्षी मुंबईतील किंग्ज सर्कल येथील ‘जीएसबी सेवा मंडळा’ने ४७४.४० कोटी रुपयांचे विमा संरक्षण घेतले होते.

## ‘इव्हेंट इन्शुरन्स’ म्हणजे काय?

मोठा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करताना अनेक आर्थिक जोखीम निर्माण होतात. कार्यक्रम रद्द होणे, मालमत्तेचे नुकसान, उपस्थितांना दुखापत होणे, चोरी किंवा अपघात यांसारख्या घटनांसाठी ‘इव्हेंट इन्शुरन्स’मधून विविध प्रकारचे संरक्षण घेता येते. कार्यक्रमाचे स्वरूप, कालावधी, अपेक्षित गर्दी, मालमत्तेचे मूल्य आणि संभाव्य जोखीम यानुसार विमा संरक्षणाची व्याप्ती निश्चित केली जाते.

## कार्यक्रम रद्द झाल्यास...

अतिवृष्टी, हवामानातील अचानक बदल किंवा नागरी आपत्कालीन परिस्थितीमुळे कार्यक्रम रद्द करावा लागू शकतो किंवा त्यावर निर्बंध येऊ शकतात. अशा वेळी सजावट, मंडप, भाडे, वाहतूक आणि अन्य व्यवस्थांवर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता असते. पॉलिसीच्या अटींनुसार ‘कॅन्सलेशन कव्हर’ असल्यास कार्यक्रम रद्द झाल्यामुळे होणाऱ्या पात्र आर्थिक नुकसानीची भरपाई मिळू शकते.

## सार्वजनिक दायित्वाचे संरक्षण

गणेशोत्सवाच्या काळात प्रसिद्ध मंडपांमध्ये मोठी गर्दी असते. मंडपात एखाद्या भाविकाला दुखापत झाली किंवा त्याच्या मालमत्तेचे नुकसान झाले, तर आयोजकांवर कायदेशीर दायित्व येऊ शकते. ‘पब्लिक लायबिलिटी’ संरक्षणामुळे पॉलिसीच्या अटी व मर्यादांनुसार पात्र वैद्यकीय खर्च, नुकसानभरपाई आणि कायदेशीर खर्चासाठी मदत मिळू शकते. मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या दृष्टीने हे आयोजकांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे कवच ठरते.

## बाप्पाच्या दागिन्यांनाही संरक्षण

अनेक मंडळे गणेशमूर्तीला सोने, चांदी, हिरे आणि इतर मौल्यवान दागिन्यांनी सजवतात. या वस्तूंच्या मोठ्या मूल्यामुळे चोरी, घरफोडी, आग किंवा अपघाती नुकसानीची जोखीम वाढते. ‘ज्वेलरी’ किंवा अलंकार संरक्षणाद्वारे पॉलिसीच्या अटींनुसार अशा मौल्यवान वस्तूंना विमा संरक्षण मिळू शकते. .

## मंडप, उपकरणे आणि कार्यकर्ते

गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणारे भव्य स्टेज, सजावट, महागड्या साउंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही नेटवर्क आणि इतर उपकरणांचे आग, विद्युत किंवा यांत्रिक बिघाडामुळे नुकसान होऊ शकते. पॉलिसीच्या स्वरूपानुसार अशा भौतिक मालमत्तेलाही संरक्षण मिळू शकते. उत्सवाच्या नियोजनापासून विसर्जनापर्यंत अनेक कार्यकर्ते आणि कर्मचारी दिवसरात्र काम करतात. या काळात अपघातामुळे दुखापत, अपंगत्व किंवा मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्ती आणि तिच्या कुटुंबावर आर्थिक संकट येऊ शकते. वैयक्तिक अपघात विम्यामुळे पॉलिसीच्या अटींनुसार अशा प्रसंगी आर्थिक मदत मिळू शकते.

## ‘ॲड-ऑन’ची सुविधा

मूलभूत संरक्षणाबरोबर गरजेनुसार अतिरिक्त ‘ॲड-ऑन’ घेता येतात. सेट व स्टेजच्या पायाभूत सुविधांचे नुकसान, उत्सवादरम्यान हाताळली जाणारी रोख रक्कम, तांत्रिक अडथळ्यांमुळे डिजिटल किंवा व्हर्च्युअल कार्यक्रमांवर होणारा परिणाम, तसेच कर्मचाऱ्यांच्या अप्रामाणिक कृत्यांमुळे होणारे नुकसान यासाठी अतिरिक्त पर्याय उपलब्ध असू शकतात. मात्र, निष्काळजीपणा, आधीपासून झालेले नुकसान, जाणूनबुजून केलेले कृत्य, सुरक्षा नियमांचे उल्लंघन किंवा आधीच माहिती असलेल्या संरचनात्मक त्रुटींना सामान्यतः संरक्षण मिळत नाही. त्यामुळे विमा घेताना केवळ विमा रक्कम न पाहता पॉलिसीतील अटी, उपमर्यादा, ‘डिडक्टिबल्स’ आणि अपवाद काळजीपूर्वक समजून घेणे आवश्यक आहे.

विमा दुर्घटना टाळत नाही; मात्र अनपेक्षित घटनेमुळे होणारा आर्थिक धक्का कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे भक्तिभाव आणि जल्लोषाबरोबरच गणेशोत्सवाच्या नियोजनात योग्य विमा संरक्षणालाही महत्त्व दिले पाहिजे.

**(लेखक ‘बजाज जनरल इन्शुरन्स’चे चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शियल) आहेत.)**